# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik – 422004

**Tel** : (0253) 2539169/174 ☎ **Student Helpline** : 0253-2539111/6659111

**Website**: www.muhs.ac.in, **E-mail**: sw@muhs.ac.in

MUHS

**डॉ. देवेंद्र शेषराव पाटील**
एम.डी.(होमिओपॅथी)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr. Devendra Sheshrao Patil**
M.D. (Homoeopathy)
**Director, Student Welfare**


जा.क्र.: मआविवि/विद्यार्थी कल्याण/एनएसएस/२१०७ /२०२४ — दि. ०३ /०७/२०२४

प्रति,
मा. अधिष्ठाता / प्राचार्य
संलग्नित सर्व महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

विषय :- **Implementation of MoU signed between the MoE and ECI for greater electoral participation.**

**संदर्भ** :- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.एमईडी-१०२२/प्र.क्र.३२५/२२/शि-२, दि.२८/०२/२०२४.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागाच्या विविध पैलूंना प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक संस्थांचे महत्व अधिक आहे. याकरिता भारतीय निवडणूक आयोगाने शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. सदर कराराच्या तरतूदींची अंमलबजावणी करण्याकरिता प्रचार साहित्य, मतदार प्रतिज्ञा, व्हिडीओ, गाणे, माहितीपत्रिका, वोटर गाईड, सेल्फी पॉईट साहित्य, विविध साहित्य पुढील गुगल लिंकवर संदर्भीय पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

https://drive.google.com/drive/folders/199911kTcw1NSZpDdq18sCaSAxyKRukw?usp=sharing

वरील गुगल लिंक वर सर्व प्रचार साहित्य उपलब्ध असून प्रचार साहित्य आपल्या महाविद्यालय स्तरावर उपलब्ध करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

१) सदर शैक्षणिक संस्थांनी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी प्रचार साहित्य त्यांच्या विविध समाज माध्यमांवर अपलोड करण्यात यावेत. तसेच विद्यार्थ्यांना कंन्टेट/रिल्स/शॉर्ट व्हिडीओ/कविता तयार करण्याबाबत प्रोत्साहन देण्यात यावे.

२) महाविद्यालय स्तरावर सेमीनार घेऊन निवडणूक प्रक्रिया विषयी माहिती देण्यात यावी. व सदर सेमीनारचे व्हिडीओ व फोटो वेबसाईट तसेच समाज माध्यम यावर #ChunavKaParvDeshKaGarva व IVoteforSure या हॅशटॅगसह प्रसिध्द करावी.

३) महाविद्यालयाच्या फेस्टीवल, उपक्रम व वार्षिक कार्यक्रमामध्ये माहिती व प्रोत्साहनात्मक व्हिडीओ, फिल्म व गाणे दाखविण्यात यावे. तसेच सदर कार्यक्रमामध्ये माहिती व प्रोत्साहनात्मक व्हिडीओ, फिल्म व गाणे विद्यार्थ्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर पाठविण्यात यावेत.

४) महाविद्यालय यांनी राष्ट्रीय मतदान जागृती स्पर्धा करण्यात यावी. सदर स्पर्धा "I Vote for Sure" या थिमवर प्रश्न मंजुषा, चित्रकला, पेंटींग, स्लोगन यांच्या समाज माध्यमांवर अपलोड करुन ते भारत निवडणूक आयोगाच्या समाज माध्यमांना टॅग करण्यात यावे.

५) मतदान प्रतिज्ञा महाविद्यालय फेस्टीवल वार्षिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

६) सेल्फी पॉईटवर विद्यार्थ्यांनी काढलेली सेल्फी विद्यार्थ्यांच्या समाज माध्यमांवर #ChunavKaParvDeshKaGarva (चुनाव का पर्व, देश का गर्व) या हॅशटॅगसह अपलोड करण्याबाबत प्रोत्साहन देण्यात यावे.

७) विद्यार्थ्यांच्या व्हाट्सअॅप ग्रुपवर व समाज माध्यमांवर वोटर गाईड, कॉमिक बुक व निवडणूक संदर्भातील प्रचार साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

यास्तव, प्रस्तुत बाब निवडणूक कार्यक्रमांशी संबंधित असल्याने प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास sw@muhs.ac.in या ईमेलवर त्वरीत पाठविण्यात यावा. जेणेकरुन सदर अहवाल शासनास सादर करणे शक्य होईल.

03/07/2024

संचालक,
विद्यार्थी कल्याण तथा
रासेयो कार्यक्रम समन्वयक

सोबत :- वरीलप्रमाणे.